# जिल्हाधिकारी, नागपूर यांचे कार्यालय

आकाशवाणी चौक, सिव्हील लाईन, नागपूर पिन कोड ४४०००१

---

क्र.राजस्व/पा.टं/ब-4अ/काวि 263 /2026 दिनांक - 13 /05/2026

विषय:- **पाणी टंचाई 2025-26 (उन्हाळा 2026)**

**नळ योजना विशेष दुरूस्ती कामांच्या प्रस्तावास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे बाबत**

संदर्भ- 1. महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र. टंचाई 1099/प्रक्र. 12/पापु 14 दि 3 फेब्रुवारी 1999

2. महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र. टंचाई 2016/प्रक्र. 143/पापु 14 दि 4 मे 2016

3. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र. टंचाई 2021/प्रक्र. 03//पापु- 14 दि 26/2/2021

4. महा. शासन पा पु व स्व विभाग शासन निर्णय क्र. टंचाई 2025 /प्रक 39/पापु 14 दि 24/4/2025

5. मुख्य कार्यकारी अधिकारी जा.क्र. जिपना /का. अभि/ग्रापापुवि/ 1227/2026 दि 31/3/2026 प्राप्त दि 8/5/2026

**आ दे श**

महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे शासन निर्णय क्रमांक टंचाई-1099/प्र.क्र.12/ पापु-14, दिनांक 3 फेब्रुवारी, 1999 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, जिल्हाधिकारी नागपूर, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद नागपूर यांनी तांत्रिक छाननी करुन पाठविलेल्या व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांनी शिफारशीसह प्रशासकीय मान्यतेकरीता सादर केलेल्या, नळ योजना दुरुस्तीच्या खालील परिशिष्टात दिलेल्या 12 कामास उपलब्ध साधनाद्वारे होणारा पाणी पुरवठा पुरेसा नसल्यामुळे व तेथील ग्रामस्थांना जलवाहीनीद्वारे पाणी पुरवठा करावा लागणार असून, त्या प्रित्यर्थ येणारा खर्च हा मोठया प्रमाणावर होणार असल्याने, तो टाळण्यासाठी वरील शासन निर्णयातील अटींचे अधिन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे.

| अ. क्र. | गाव | ग्राम पंचायत | तालुका | भाग क्र. | तांत्रिक मान्यता | | किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | क्र. | दि. | |
| 1 | लावा | लावा | नागपूर | 2 | 237 | 30.03.2026 | 1499345 |
| 2 | तारणा | तारणा | कुही | 2 | 52 | 30.03.2026 | 988839 |
| 3 | राजोला | राजोला | कुही | 2 | 54 | 30.03.2026 | 938680 |
| 4 | रुयाड | रुयाड | कुही | 2 | 238 | 30.03.2026 | 578512 |
| 5 | मरगसुर | मरगसुर | काटोल | 2 | 235 | 30.03.2026 | 874448 |
| 6 | कोंढासावळी | कोंढासावळी | काटोल | 2 | 233 | 30.03.2026 | 799227 |
| 7 | सोनोली | सोनोली | काटोल | 2 | 240 | 30.03.2026 | 1930657 |
| 8 | कोळंबी | खानगाव | काटोल | 2 | 84 | 13.03.2026 | 182452 |
| 9 | चिखली मैंना | गोन्ही | काटोल | 2 | 83 | 13.03.2026 | 121817 |
| 10 | सोनमोह | चिखली माळोदे | काटोल | 2 | 184 | 30.03.2026 | 1606646 |
| 11 | सोनखांब | सोनखांब | काटोल | 2 | 232 | 30.03.2026 | 999077 |
| 12 | डोरली भिंगारे | डोरली भिंगारे | काटोल | 2 | 234 | 30.03.2026 | 1151258 |
| | | | | | | एकूण | 11670958 |

नळ योजना विशेष दुरुस्ती चे काम घेतांना शासनाचे शासन निर्णय / परिपत्रकातील स्थाई आदेश, नियम व सर्व अटींचे काटेकोर पालन करण्यात यावे.

1. सदरील कामे तातडीने पूर्ण करणे आवश्यक राहील. जेणेकरून सदरील कामे टंचाई कालावधीत उपयोगात आणता येईल. तसेच प्रगतीबाबत साप्ताहिक अहवाल पाठवावेत.
2. योजनेवरील खर्च मंजूर अनुदानातूनच करावा, प्रस्तावित व मंजूरीपेक्षा जास्त खर्चास किंवा त्यानंतर सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येणार नाही.
3. सदर योजना शक्यतोवर जिल्हा परिषदेच्या जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी मधून घेण्यात यावी, तसे शक्य नसल्यासच टंचाई अंतर्गत घ्यावी.
4. सदर योजना राबवितांना दुरुस्तीमुळे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा निश्चितपणे वाढेल याबाबत प्रथम खात्री करावी.
5. कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु.वि.जिल्हा परिषद,नागपूर, उप विभागीय अधिकारी / तहसिलदार/ यांनी या कामावर बळकट नियंत्रण व देखरेख ठेवावी.
6. सदरहू कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असली तरीही आवश्यक असल्यासच सदरहू कामे घेण्यात यावी.
7. सदरहू योजना यशस्वीपणे राबविण्याची संपूर्ण जबाबदारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांचेवर राहील.
8. सदर नळ योजनेच्या विशेष दुरुस्ती अत्यंत तातडीने व त्याच टंचाई कालावधीत पूर्ण होवून नागरिकांना टंचाई कालावधीत पाणी पुरवठा होईल. याची संपूर्ण जबाबदारी कार्यकारी यंत्रणेची राहील.
9. काम सुरू करण्यापुर्वी व कामपूर्ण झाल्यानंतर कामाचे फोटो काढून या कार्यालयास तपासणी साठी उपलब्ध करून दयावे.
10. पाणी जीवनावश्यक / अत्यावश्यक बाब असल्याने, त्या आडून गैरप्रकार होणार नाहीत, त्याच त्याच योजना पुन्हा पुन्हा दरवर्षी घेण्यात येत नाही व त्यावर अनावश्यक खर्च करण्यात येत नाही, याची खात्री मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांनी करावी.

(कुमार आशीर्वाद)
जिल्हाधिकारी नागपूर

प्रत :- 1. मा. आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस सादर.
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर
3. वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, नागपूर

जिल्हाधिकारी नागपूर